**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

## प्रेसनोट दिनांक – ०१/१२/२०२४

**दि.३०/११/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | निगडी ५६०/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम १०९(१), ३५१(२) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.३०/११/२०२४ रोजी ०७.४५ वा. चे सुमा सर्वे न.८३/२ प्लॉट न.४५ शिवशंभो कॉलणी साईनाथनगर निगडी पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.३०/११/२०२४ रोजी १३/१९ वा. |
| फिर्यादी | :- | अरविंद मोहन खोलीया वय ५५ वर्षे धंदा-गवंडी काम रा. साईनाथनगर निगडी पुणे |
| आरोपी | :- | वल्लभ मोहन खोलीया वय ५३ वर्षे रा. साईनाथनगर निगडी पुणे **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी व त्यांची पत्नी हे मंदिरामधुन दर्शन घेवून घराचे गेट जवळ येवून गेट उघडत असताना फिर्यादीचा भाऊ आरोपी याने यापुर्वी वडीलोपार्जीत घराचे वाटणीपत्रावरुन झालेले जुन्या भांडणाचा राग मनात धरुन तुम्हाला आता जिवंत सोडत नाही असे म्हणुन फिर्यादी व त्यांची पत्नी नैना यांना जिवे मारण्याचे उद्देशाने फिर्यादीचे डोळ्यात मिरची पुड टाकुन फिर्यादी व त्यांची पत्नी नैना वय ५३ वर्षे हिचे डोक्यात लोखंडी रॉडने मारुन त्यांना गंभीर जखमी केले म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | मसपोनि आजगेकर ९८३४४१६५९१ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | पिंपरी १०७५/२०२४ भा.न्या. संहिता २०२३ चे कलम ३१८(४) ३(५) माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (ड) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२८/११/२०२४ रोजी दुपारी १२/२० वा. सुमा ते दि.२९/११/२०२४ रोजी १३/०० वा. चे दरम्यान महावीर क्लीनिक, मोहननगर, चिंचवड, पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.३०/११/२०२४ रोजी १८/५९ वा |
| फिर्यादी | :- | डॉ. भारत कांतीलाल शहा वय.७६ वर्षे, व्यवसाय. डॉक्टर रा. ॲटो क्लस्टर जवळ, चिंचवड, पुणे. १९ |
| आरोपी | :- | रविकुमार व इतर एक इसम **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी आरोपी यांनी संगणमत करून फिर्यादीस वॉट्सअप कॉल करून मी सीबीआय अधिकारी आहे असे सांगुन तुमच्या क्रेडीट कार्ड वरून एक कोटीचे ट्रान्जेक्शन झालेले आहे. अशी सांगुन तुम्हाला सुप्रिम कोर्टाची व ई.डी ची खोटी नोटीस मोबाईल वॉट्सअपवरती पाठवुन तुम्हाला अटक होणेपासुन वाचायचे असेल तर २०,०००,०० /- (वीस लाख रूपये ) भरावे लागतील. असे फिर्यादीस सांगुन आयसीआयसीआय बॅक अकॉउँट नंबर १९४२०५००१०४६, व आयएफएससी कोड आयसीआससी ०००१०४६ हाय ग्रो क्रॉप केअर प्रा.लि. यावरती आरटीसी क्रोस रोड करंट अकॉउंटमध्ये २८,३५,०००/- रूपये (अठ्ठावीस लाख पस्तीस हजार) रूपये टाकण्यास सांगुन फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोनि (गुन्हे) कापरे ९८६०९४९८२५ |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | काळेवाडी १२८१/२०२४ भा.न्या.सं.कलम १०६, २८१ एम.व्ही. ॲक्ट कलम १८४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२१/१०/२०२४ रोजी १४.३० वा सुमा. तनिष टाईल्स सर्वे नं.९५/१/२ आदर्श चौक,पिंपरी चिंचवड शाळा नं. ५६/१ चे जवळ विजयनगर काळेवाडी पुणे |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा दाखल | :- | दि.३०/११/२०२४ रोजी २२.०८ वा |
| फिर्यादी | :- | जयंत कमलाकर महामुनी वय ४२ वर्षे व्यवसाय-नोकरी रा. विजयनगर काळेवाडी पुणे |
| आरोपी | :- | ट्रक चालक सोनुकुमार महेंद्र चौधरी सध्या रा.मंचर ता.आंबेगाव जि.पुणे **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी काळेवाडी पुणे येथे फिर्यादी यांचा भाऊ उदय कमलाकर महामुनी वय ४४ वर्षे रा. सदर हा ट्रक नं.डी डी.०२.सी.९००७ मधील टाईल्स उतरविणेचे काम करीत असताना ट्रक चालक आरोपी याने त्याचे ताब्यातील ट्रक हा निष्काळजीपणे व बेदरकारपणे चालविल्यामुळे त्यातील काही टाईल्स उदय महामुनी याचे अंगावर पडुन तो मयत झाला आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि गायकवाड ९५५२५४६१३१ |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी १३५०/२०२४ भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १०६, १२५ (ब) २८१,३२४ (४) (५) मो.वा.का. कलम ११९/१७७, १८४. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१८/११/२०२४ रोजी पहाटे ०२/०० वा. सुमा. मुबंई बंगलोर हायवे एसपीआरआयएनटी कंपनी समोर बाणेर पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.३०/११/२०२४ रोजी २२.५२ वा |
| फिर्यादी | :- | सुनिल अशोक नगरकर वय ४७ वर्षे, धंदा- नोकरी, रा- विनोंदेवस्ती, वाकड, पुणे. |
| आरोपी | :- | उमेश गौतम बनसोडे वय ३१ वर्षे धंदा. मजुरी रा. चिंतामणी चौक, वाल्हेकरवाडी चिंचवड पुणे **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांची यामाहा कंपनीची एफ.झेड मोटार सायकल नंबर एम.एच. १४ एल.डी. ७०९६ ही त्यांचा मित्र रविंद्र कुमार नाहक रा. नवले ब्रिज जवळ, पुणे (मयत) हा घेवुन गेला असता त्याने त्याचे ताब्यातील मोटार सायकल वाहतुकीच्या नियमाकडे दुर्लक्ष करुन, मोटार सायकल हयगयीने भरधाव वेगात चालवुन स्वतः डीव्हायडरला धडकुन गंभीर जखमी होवुन मोटार सायकलचे नुकसान करुन उपचारा दरम्यान स्वःताचे मृत्युस कारणीभुत झाला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि फड ९०११०५१३५७ |

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | काळेवाडी१२७९/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम १२५ (ब), २८१, मो.वा. कायदा कलम १८४, १३२(१)(क), ११९/१७७. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १९/११/२०२४ रोजी १८.३० वा सुमा. एम एम चौक काळेवाडी पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.३०/११/२०२४ रोजी १८/१३ वा. |
| फिर्यादी | :- | सर्जेराव रंगराव पाटील वय ५७ वर्षे, धंदा सुखवस्तू, रा. आझाद चौक, काळेवाडी, पुणे |
| आरोपी | :- | दुचाकी नं एम एच १४ के के ६३७४ वरील अनोळखी चालक |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी राहते घरातून ज्योतीबा गार्डनकडे अॅक्टीव्हा दुचाकी गाडी नं एम एच १४ डी झेड ६८४२ हिचेवर जात असताना फिर्यादी हे एम एम चौकाकडून गार्डनकडे उजवीकडे वळून जात असताना एम एम चौक काळेवाडी पुणे येथे एम्पायर इस्टेट कडील बी आर टी मधून वाहतूकीचे नियमांकडे दुर्लक्ष करुन एम एच १४ के के ६३७४ दुचाकी वरील अनोळखी इसमाने भरधाव वेगाने येवून फिर्यादीचे उजव्या पायावर जोरात धडक देवून फिर्यादीचा गुडगा फ्रॅक्चर करणेस कारणीभुत झाला.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि मेटे ९४०५१२११५३ |

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण ८८१/२०२४ प्राण्याचा छळ प्रतिबंध कायदा कलम ११(१) (ड),११(१)(ई),११(१), महाराष्ट्र प्राणी संरक्षण (सुधारणा) अधिनियम १९९५ चे कलम ५(अ)व कलम ५(ब)व मोटार वाहन कायदा कलम १९८९ चे कलम १२५ ई प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.३०/११/२०२४ रोजी दुपारी १२/०० वा चे सुमा मौजे रोहकल रोड डायमंड चौकाजवळ ता खेड जि पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.३०/११/२०२४ रोजी २१/२७ वा |

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :- | अतुल सखाराम कोंढवळे वय-३७ वर्ष, पो.कॉ. बं.न. २८८० नेमणुक चाकण पोलीस ठाणे |
| आरोपी | :- | १)कुशाबा यमा पारधी वय- २८ वर्षे २)संदीप कावजी वडेकर वय २५ दोघे रा. मु.पो.पिपरगणे ता.आंबेगाव जि.पुणे ३)शंकर उत्तम पाटील वय- ४५ वर्षे,रा. मु. पो.दहिगाव ता. माळसिरस जि.सोलापुर |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी महिंद्रा कंपनीची १,७५,०००/- रुपये किंमतीची पिकअप बोलेरो एम एच - १४ ई एम - ७२४९ याचेत २९०००/- रुपये किंमतीचे दोन बैल दाटीवाटीने करकसुन बांधुन चारापाण्याची व्यवस्था न करता कत्तलीसाठी वाहतुक करीत असताना आरोपी क्र १ व २ हे मिळुन आले व महिंद्रा कंपनीची १,५०,०००/- रुपये किंमतीची पिकअप बोलेरो एम एच - ११ बी एल - ०४४९ याचेत ३४०००/- रुपये किंमतीचे तीन बैल दाटीवाटीने करकसुन बांधुन चारापाण्याची व्यवस्था न करता कत्तलीसाठी जनवारे वाहतुकीचा परवाना नसताना आरोपी क्र ३ हे मिळुन आले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा गवारी ८८०६८८९०५० |

०६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | आळंदी ३८४/२०२४ भा. न्या. संहिता ११५(२),११८(१), ३३३, १८९(२),१९१(२) १९०, ३२४(४),३५२ ३५१(२) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. ३०/११/२०२४ रोजी २१.०० वा चे सुमा केळगाव रोड सुलभ शौचालयाचे समोर, आळंदी , ता. खेड जि. पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०१/१२/२०२४ रोजी ०१.१४ वा |
| फिर्यादी | :- | महेंद्र किसन मुंगसे वय ४२ वर्षे, धंदा. नगरपालिका कर्मचारी रा. केळगाव रोड , सुलभ शौचालयाचे समोर, आळंदी , ता. खेड जि. पुणे |
| आरोपी | :- | ऑटो रिक्षा चालक माउली भांबरे व त्याचे सोबत असलेल्या ५ इसम<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्यांचे घराचे बाजुचे त्यांचे मालकीचे शेतात एक इसम हा चालत जात असताना त्यास आमचे शेतात लघवी करण्यासाठी जावु नको म्हणाल्याचा राग येवुन फिर्यादी यांना शिवीगाळ, दमदाटी केली व त्याचा राग मनात धरुन त्याने इतर ५ इसमांस बोलावले, त्यात फिर्यादी यांचे परीचयाचा ऑटो रिक्षा चालक आरोपी हा ही होता. फिर्यादी यांनी घराचे दरवाजास आतुन कडी लावुन दरवाजा बंद केला असता वरील ६ लोकांनी येवुन घराचे खिडक्यांवर दगड मारुन खिडक्या फोडल्या तसेच दरवाजावर दगड व लाथा मारुन दरवाजाची कडी तोडुन दरवाजा उघडुन फिर्यादीचे घरात अनाधिकाराने फिर्यादीचे संमती शिवाय प्रवेश करुन मारहान केली. त्यापैकी एकाने फिर्यादीचे डोक्यात वीट मारुन जखमी केले तसेच फिर्यादी यांचा आवाज ऐकुण फिर्यादीचा भाऊ राहुल किसन मुंगसे हा सोडवण्यासाठी आला असता त्याला देखील इतर एकाने ऊसाचे दांडक्याने मारहान केली. फिर्यादी यांची आई त्यांना सोडवायला आली होती तेंव्हा तिलाही गालाचे खाली खरचटले आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि गिरीगोसावी ९४०३६०४८२६ |